| | |
|---|---|
| MHKO070009192015 | <u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३०३/२०१५</u><br>**अजित दत्तात्रय घाटगे**<br>**विरुध्द**<br>**वैभव विठ्ठल पाठक** |

## <u>नि.क्र.९० खालील आदेश</u>

अर्ज वाचला. त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

०२. आरोपीने न्यायालयाने पारित केलेला पुरावा बंद चा आदेश रद्दबातल करुन पुरावा देणेस परवानगी देण्यात यावी यासाठी सदरचा अर्ज दिलेला आहे. आरोपीचा पुरावा बंद चा आदेश हा दि.२५/०९/२०२५ रोजी पारित झालेला आहे. त्यानंतर नेमलेल्या तारखेस आरोपीने सदरचा अर्ज दिलेला आहे. आरोपीने अर्जात आरोपी यांना नोकरीतुन रजा मिळाली नसल्याने व त्यांना कंपनीच्या कामानिमित्त परगावी जावे लागल्याने वकीलांना भेटता आले नसल्याचे तसेच आरोपीचे वकील हे मागील तारखेस आजारी असल्याने न्यायालयात हजर राहू शकले नसल्याचे कथन केले आहे. परंतू आरोपीतर्फे त्या अनुषंगाने कागदपत्रे दाखल केल्याचे दिसुन येत नाही. त्यासोबतच आरोपीने अर्जात नमुद प्रमाणे मा. वरिष्ठ न्यायालयात दाखल केलेल्या प्रकरणाच्या अनुषंगाने कागदोपत्री पुरावा हा दाखल केल्याचे दिसुन येत आहे.

०३. दि.२५/०९/२०२५ रोजी एका तारखेस आरोपीने अर्ज दिला नसल्याने किंवा त्यादिवशी त्यांचा पुरावा दिला नसल्याने त्यानंतर त्यांना संधी देवुच नये असे संयुक्तीक होणार नाही. प्रत्येक केस ही गुणदोषावर निकाली निघणे हे अत्यंत गरजेचे आहे. प्रस्तुतचे प्रकरण हे १० वर्षांपेक्षा जास्त जुने आहे. त्यामुळे आरोपीने त्या अनुषंगाने घेतलेल्या वेळेनुसार सदर अर्जावर कॉस्ट लावणे उचित होणार आहे. करीता मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.९०) हा आरोपी यांनी खर्च म्हणून फिर्यादी यांना र.रू.२५०/- (र.रु.दोनशे पन्नास फक्त) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. आरोपी विरुध्द झालेला पुरावा नाही चा आदेश खर्चाची पुर्तता झाल्यास रद्द समजावा.

३. खर्चाची पुर्तता पुढील तारखेस किंवा तत्पुर्वी करावी.

४. दोन्ही पक्षकारांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.04.09 17:42:55 +0530

जयसिंगपूर

दिनांक-०९/०४/२०२६

**(अ. त्रिं. मनगिरे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१

जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 09/04/2026. |
| Judgment/order signed by the PO on | 09/04/2026. |
| Judgment/order uploaded on | 09/04/2026. |